People's Welfare Society's

# Dr. Madhukarrao Wasnik
# P.W.S. Arts and Commerce College

Kamptee Road, Nagpur-440 026

Affiliated to

**Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University**

**Nagpur**

Reaccreditated 'B' by NAAC, Bangalore

# PROSPECTUS 2016 – 17
## GRADUATE COURSES



# Message from the Chairman
## संस्थेचे अध्यक्ष

**डॉ. मधुकरराव वासनिक** – माजी आमदार
एम.बी.बी.एस., डीसीएच, एमए (लोक प्रशासन), एल.एल.एम.

माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनो !

ज्ञानामुळं मती, गती, आणि उन्नतीचे मार्ग खुले होतात असे सर्वच महापुरूषांचे मत आहे. यांच्या विचारांनुसार १९६८ ला मागासवर्गीय भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानाचे दरवाजे उघडे करण्यासाठी पी.डब्ल्यू.एस. कला–वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. अनेक अडचणींवर मात करीत आपल्या सर्वांच्या सहकार्याने आज महाविद्यालयाला 'बी' चा दर्जा प्राप्त झाला.

आज संगणक साक्षर आणि संगणक निरक्षर अशी ज्ञानक्षेत्रातील बदलाची आपण दाखल घेतली पाहिजे. स्पर्धा, तंत्रज्ञान, ज्ञान–विज्ञान, उद्योगाच्या क्षेत्रात आमचे विद्यार्थी अग्रेसर राहतील या दृष्टीने नियोजन करण्याची गरज आहे. माझ्या संस्थेतील विद्यार्थी जगातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करतील. यशस्वी जीवन जगतील, अशी अच्छा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व अडथळयावर मात करीत आंतरराष्ट्रीय क्षेत्रात स्वत:चा ठसा निर्माण केला. जीवनाला स्पर्श करणाऱ्या सर्व विषयातील जागतिक विचारवंतांच्या समोर आपली विद्वता आणि मानवता सिद्ध केली. त्यांच्या प्रेरणेतून आम्ही घडलो. त्यांची प्रेरणा घेऊन त्यांच्या आदर्श समोर ठेवून प्रत्येक विद्यार्थ्यांने पुढील वाटचाल करावी. तुमच्या जगण्याचा आम्हालाही गौरव वाटावा अशी नवी वाट निर्माण करावी. सामाजिक बांधिलकीचे पाईक बनून आपल्यासाठी कार्य करणाऱ्या महापुरूषांचे ऋण फेडावे, अशी अपेक्षा आहे.

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी नम:पूर्वक स्वागत करतो, धन्यवाद !

– डॉ. मधुकरराव वासनिक



## कार्यकारी प्राचार्य
## डॉ. आर. पी. गान
## एम.कॉम. एम.ए. (अर्थशास्त्र), बी.एड. एम.फील, पीएच.डी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित— पीडित व मागासलेल्या समाजाला शिक्षणशिवाय तरणोपाय नाही म्हणून शिक्षण घेणे आवश्यक आहे. असा मंत्र दिला त्यामुळे दलितांच्या शिक्षणाची सोय करणे हे समाजाच्या कल्याणासाठी आवश्यक आहे हे ओळखून डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या पुढाकाराने पीपल्स वेलफेअर सोसायटी, नागपूर या संस्थेची १९६७ ला स्थापना करण्यात आली.

नागपूर शहराच्या उत्तर विभागातील दलित व मागासलेल्या समाजाकरिता विश्वविद्यालयीन शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशाने पिपल्स वेलफेअर सोसायटीने महाविद्यालय स्थापन करण्याचे योजिले त्यानुसार डॉ. मधुकरराव वासनिक, न्या. आर. आर. भोळे, प्राचार्य बलराज अहेर, श्री ए.डी. मेश्राम, डॉ. सोनकाळे, श्री वामनराव गेडाम इत्यादी मान्यवरांच्या पुढाकाराने १९६८ ला शासन व विद्यापीठाच्या अनुमतीने महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

संस्थेचे उच्च शिक्षणाचे क्षेत्र नागपूर शहरापुरते मर्यादित न ठेवता १९८३ — ८४ या शैक्षणिक सत्रापासून नागपूर जिल्हयातील कळमेश्वर ला संस्थेचे अध्यक्ष डॉ. वासनिक यांच्या पुढाकाराने इंदिरा गांधी कला—वाणिज्य महाविद्यालय स्थापन करण्यात आले.

महाविद्यालयाच्या यशाला व विस्ताराला ज्याप्रमाणे या महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे तसेच या परिसरातील जनतेचे व सामाजिक कार्यकर्त्यांचे सहकार्य करणीभूत ठरते, त्याचप्रमाणे पीपल्स वेलफेअर सोसायटीच्या कार्यकारणीचा व उच्च शिक्षणा विषयीची आस्था या बाबीसुद्धा तितक्यात कारणीभूत ठरलेल्या आहेत.

— डॉ. रमेश पी गान

## पीपल्स वेलफेअर सोसायटी

## व्यवस्थापन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | श्री डॉ. मधुकरराव वासनिक | : | अध्यक्ष |
| 2 | श्री ॲड. पी. झेड, लांजेवार | : | उपाध्यक्ष |
| 3 | श्री मोहन वासनिक | : | सचिव |
| 4 | श्री मनोज वासनिक | : | सहसचिव |
| 5 | श्री अटल बहादूर सिंग | : | सदस्य |
| 6 | श्री ॲड, बी.एस. वासनिक | : | सदस्य |
| 7 | श्रीमती डॉ. व्ही. एम. वासनिक | : | सदस्य |
| 8 | श्री डॉ. एन.एन. रामराजे | : | सदस्य |
| 9 | श्री प्रकाश मदनानी | : | सदस्य |
| 10 | श्री डी.के. बनसोड | : | सदस्य |
| 11 | श्री मनिष लांजेवार | : | सदस्य |

## स्थानीय व्यवस्थापन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | श्री डॉ. मधुकरराव वासनिक | : | अध्यक्ष |
| 2 | डॉ. आर. पी. गान | : | कार्य.प्राचार्य/स्थानीय व्यवस्थापन सचिव |
| 3 | ॲड. पी. झेड, लांजेवार | : | व्यवस्थापन सदस्य |
| 4 | ॲड. बी. एस. वासनिक | | व्यवस्थापन सदस्य |
| 5 | श्री मनोज वासनिक | : | व्यवस्थापन सदस्य |
| 6 | श्री मोहन वासनिक | : | नामनिर्देशित सदस्य |
| 7 | श्री आकाश मदनानी | : | नामनिर्देशित सदस्य |
| 8 | डॉ. नरेन्द्र बागडे | : | शिक्षक प्रतिनिधी |
| 9 | डॉ. सुरेश भागवत | : | शिक्षक प्रतिनिधी |
| 10 | डॉ. चंद्रशेखर पटील | : | शिक्षक प्रतिनिधी |
| 11 | रवी खोब्रागडे | : | कर्मचारी प्रतिनिधी |

## FACULTY MEMBERS

### Principal (Off.): Dr. Ramesh P. Gan

### Vice- Principal: Dr. Pradnya M. Bagade

**Det. Of Commerce**
Dr. R.P. Gan (Off.Principal & HOD)
Dr. A.V. Deshmukh
Prof. M. D. Misal
Dr. N.S. Bagade
Dr. S.A. Bhagwat
Dr. V. S. Chavan

**Dept. of English**
Dr. Shubha Mishra (HOD)
Prof. Sudesh.B. Bhowate
Dr. Megha D. Ramteke
Prof. A.D. Mendhe
Prof. M. Dudhe

**Dept. of Pali & Prakrit**
Prof. Pranoti M. Sahare (HOD)
Prof. Pratibha V. Pakkide

**Dept. of Hindi**
Dr. M.J. Awasthi (HOD)
Dr. Sumedh Nagdeve

**Dept. of Economics**
Dr. Pradnya M.Bagade (HOD)
Dr. Rajani V. Sontakke

**Dept. of Political Science**
Dr. Vimal G. Rathod (HOD)

**Dr.Ambedkar Though & Pali Parakrit Research Centre**
Co. ordinator
Dr. B. K. Khandekar

**Dept.of Sociology**
Prof. K.P. Tagade (HOD)
Prof. M. Yerkelwar

**Dept of History**
Dr. C. S. Patil (HOD)
Dr. M. V. Gaikwad

**Dept. of Library**
Shri S.R. Wani, Librarian
Shri S.S. Niranje,
Asstt. Librairan

**Dept. of Marathi**
Dr. I.K. Orke (HOD)
Dr. Manisha R. Nagpure
Prof. Amruta Doriliakar

**Dept. of Phy.Education**
Prof. A. K. Pande (HOD)
Dr. Y. V. Patil

---

**Non Teaching Staff**

| | | |
|---|---|---|
| Shri D. R. Jaiswal | Shri M. S. Borkar | Shri D. B. Chahande |
| Shri S. S. Patil | Shri V. B. Pendam | Shri P. P. Lanjewar |
| Shri M. Y. Wasnik | Shri P. J. Hatbude | Shri B.Y. Askar |

**Library Attendant**

| | | |
|---|---|---|
| Shri R. M. Meshram | Shri R. H. Khobragade | Shri S. W. Gedam |
| Shri K. P. Bawangade | Shri K. M. Gaikwad | Smt. M. C. Lokhande |
| | Shri S. B. Madavi | Shri K. M. Rathod |

**Peon**

| | | |
|---|---|---|
| Smt. K. N. Koche | Shri R. C. Gaure | Ku. A. L. Ghadle |
| Shri P. A. Dhole | Shri Mehmood Ali | Shri R. S. Pendam |
| Shri P. B. Ade | Shri R. Y. Askar | |

# आमच्या महाविद्यालयाचे दूरदृष्टिकोन, ध्येयपथ

आमचे महाविद्यालय क्रांतिसूर्य बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणातून साकारलेले आहे. ते स्वत: उच्च विद्या विभूषीत असल्याने शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे, हे त्यांनी जाणले होते. या अनुषंगाने आपल्या जीवन कार्यातून त्यांनी भारतीय समाजात उच्च शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यांचे शिक्षणविषयक क्रांतिकारक विचारच आमच्या महाविद्यालयाचे दूरदृष्टीकोन, ध्येयपथ व उदिष्टये आहेत.

## दूरदृष्टिकोन—

आमच्या महाविद्यालयातून असा विद्यार्थी घडावा जो मानवतावादी, शोधक बृद्धिचा, विज्ञाननिष्ठ व परिवर्तनवादी असावा. त्याचे स्वातंत्र्य, समता, बंधुता व समान न्याय या मानवी मूल्यांच्या आधारे समाजाचे समर्थ नेतृत्व करावे आणि एक उत्तम भारतीय नागरिक म्हणून देशाच्या जबाबदाऱ्या आपल्या खांद्यावर घेण्यास तत्पर असावा.

## ध्येयपथ—

१. अल्प खर्चात उच्च दर्जाचे शिक्षण देणे, जेणे करून गरिबतला गरीब विद्यार्थीही या शिक्षणाचा लाभ घेऊ शकेल.

२. मागासवर्गीय समाजाच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे, त्यासाठी महाविद्यालयामध्ये उत्तम शिक्षणाच्या सोयी व वातावरण निर्मिती करणे त्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास साधला जाईल.

३. महाविद्यालय विद्यार्थ्यांमध्ये उच्च संशोधन वृत्तीचे वातावरण निर्मिती करणे व आवश्यक सोयी उपलब्ध करणे. सोबतच वेळोवेळी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा आणि विविध विषयांच्या अनुषंगाने प्रकल्प राबविणे.

४. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व प्रकारे सोयी उपलब्ध व्हावे म्हणून इतर महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रम व प्रकल्प आखणे तसेच राबविणे. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठीव त्यांना मोठे उद्योजक बनविण्यासाठी योग्य मार्गदर्शन करून प्रोत्साहित करणे.

५. कला व वाणिज्य शाखेतील सामाजिक दृष्टया योग्य आणि अद्यावत ज्ञानाचे संदेशवहन करणे.

६. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शाखेतील सामाजिक दृष्टया योग्य आणि अद्यावत ज्ञानाचे संदेशवहन करणे. समाजातील जबाबदार नागरिकांचे सक्रीय सहकार्य अपेक्षीत ठेवून, कठोर प्रयत्न करणे.

७. विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीची भावना, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रीय एकतेबद्दल प्रेम निर्माण करण्यास प्रवृत्त करणे.

## विद्यार्थ्यांकरीता आवश्यक सूचना

महाविद्यालय परिसरात शांतता, शिस्त व शैक्षणिक वातावरण निर्मितीकरीता तसेच ते कायम ठेवण्याकरीता प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला खालील नियमांचे पालन करणे अनिवार्य राहील. नियमांचा भंग केल्यास विद्यार्थ्यांवर उचित कारवाई केली जाईल व आवश्यकता भासल्यास प्रवेश सुद्धा रद्द केला जाईल.

## अ. प्रवेशासंबंधी सूचना—

१. महाविद्यालयाच्या कोणत्याही वर्गात प्रवेश घ्यावयाचा असल्यास माहिती पत्रकासोबत जोडलेला प्रवेश अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात पूर्णपणे भरून स्वत:च्या आणि वडीलांच्या किंवा पालकांच्या स्वाक्षरीने सादर करावा.
२. प्रवेश समितीच्या मार्फत घेतलेला प्रवेश वैद्य समजण्यात येईल. विद्यार्थ्याने अन्य कुणाचाही मार्फत सरळ प्रवेश घेतल्याचे आढळून आल्यास प्रवेश रद्द केला जाईल.
३. प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्याला स्वत: आवश्यक कागदपत्रांसह हजर असणे आवश्यक राहील.नातेवाईक/मित्र/अन्य कोणाही मार्फत प्रवेश दिला जाणार नाही.
४. विद्यार्थ्यानी एकदा घेतलेले ऐच्छिक विषय बदलता येणार नाही.
५. स्कॉलशीप घेणाऱ्या विद्यार्थ्यानी आपले बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडवावे, त्याशिवाय प्रवेश निश्चित केला जाणार नाही.
६. ॲडमिशन फार्मवर बँक अकांउट नंबर लिहावा, तसेच बँकेचे नाव लिहावे.
७. अध्यापनाचे माध्यम इंग्रजी, मराठी व हिंदी राहील ते निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना राहील.
८. महाविद्यालयाचे वर्ग सकाळी ७.१५ ते १२.१५ पर्यंत होतील.

## ब. महत्वाच्या सूचना—

१. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला ओळखपत्राशिवाय महाविद्यालय परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.
२. महाविद्यालय परिसरात प्रवेश केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मोबाईल बंद ठेवावे.
३. नियमित वर्ग सुरू झाल्यावर वर्गात सतत अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्याचा प्रवेश कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द केला जाईल.
४. विद्यार्थ्यानी आपसात असम्बद्ध वागणुक केल्याचे आढळून आल्यास तसचे शिक्षकांसोबत अरेरावीपूर्ण वर्तणूक करणाऱ्या विद्यार्थ्याविरूद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.
५. महाविद्यालय परिसरात धुम्रपान/पान/तंबाखु/गुटखा खाण्यावर पर्णपणे प्रतिबंध राहील.
६. विद्यार्थ्यानी आपली वाहने निर्धारीत स्थहीच ठेवावी तसेच वाहनावर बसू नयेत.
७. विद्यार्थ्यांना काही तक्रार असल्यास त्यांनी तक्रार निवारण समितीशी संपर्क करावा.
८. महाविद्यालयातील फर्निचर, विजेची उपकरणे इ. चा उपयोग काळजीपूर्वक करावा. महाविद्यालयाच्या कोणत्याही संपत्तीची मोडतोड करणाऱ्या विद्यार्थ्यावर दंड आकारला जाईल.
९. महाविद्यालयासंबंधी कोणतीही माहिती वर्तमान पत्रात देण्यापूर्वी प्राचार्याची अनुमती आवयक आहे.
१०. प्राचार्य/ उपप्राचार्याच्या पूर्वानुमतीशिवाय महाविद्यालयात कोणतीही समिती अथवा मंडळ स्थापन करता येणार नाही.
११. वेळोवेळी प्राचार्य/उपप्राचार्यनी केलेले नियम व काढलेले आदेश विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील.
१२. मान्यताप्राप्त डुप्लीकेट आयकार्ड आणि डुप्लीकेट टी.सी. मिळविण्याकरिता विद्यार्थ्याला रू. ५०/— भरावे लागतील.
१३. कॉलजेमध्ये प्रवेश झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत ओळख पत्रावर माननीय प्राचार्य यांची सही घेणे आश्यक आहे. अन्यथा ५० रू दंड आकारण्यात येईल.

## प्रवेश अर्जासोबत जोडावयाची प्रमाणपत्रे

१. महाविद्यालय/ विद्यालय सोडल्याचा प्रमाणपत्राची मूळ प्रत.
२. गुणपत्रीकेची मूळप्रत आणि एक प्रमाणित प्रत.
३. सद्वर्तनाबद्दलची दोन गृहस्थांकडून मिळवलेली दोन प्रमाणपत्रे.
४. नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळविण्याकरिता आपल्या कार्यालयातील अधिकाऱ्याचे लेखी अनुमती पत्र.
५. प्रवेशार्थिच्या छायाचित्राच्या दोन प्रती.
६. अंत्य वर्ष कला/ वाणिज्य विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष कला/ वाणिज्य, द्वितीय वर्ष कला/ वाणिज्य उत्तीर्ण केलेल्या परिक्षा गुणपत्रीकेच्या सत्य प्रतिलिपी जोडणे आवश्यक आहे.
७. शिष्यवृत्ती, फ्रिशीप आणि इ. बी.सी. धारक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेते वेळेस वेळेस संबधीत फार्म भरून देणे अनिवार्य राहील. त्याशिवाय प्रवेश निश्चित होणार नाही.
८. स्वत:च्या पत्ता लिहिलेले व ५ रूपयाचा पास्ट स्टॅम्प लावलेले दोन लिफाफे.

**टीप:**

१. वरील प्रमाणपत्रशिवाय प्रवेश अर्ज स्वीकारल्या जागणार नाही.
२. महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी विद्यालय अथवा महाविद्यालय बदलण्याचे दिलेले प्रमाणपत्र नंतर परत मिळणार नाही.
३. जो विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक बोर्डाव्यतिरिक्त इतर परिक्षा पास झालेले असतील त्यांनी स्थानांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) दि. ३० सप्टेंबर २०१६ च्या आत सादर करावे. तसे न केल्यास विद्यापिठाकडून रू. १०० दंड दरमहा आकारल्या जाईल व त्याचा प्रवेश अस्थाई (Provisional Admission) समजला जाईल.

**पालकांसाठी सूचना:**

आपल्या पाल्याचे भवितव्य उज्ज्वल व्हावे हया उद्देशाने त्याला आपण महाविद्यालयात प्रवेश प्राप्त करू इच्छित आहात, त्याचा अभ्यास व दैनंदिन कार्यक्रम हयाविषयी आपणाला रूची आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या कार्यात आम्हाला आपले सहकार्य लाभेल ही अपेक्षा आहे.

१. आपण कमीतकमी दोन महिन्यातून एकदा तरी महाविद्यालयातील अध्यापकांना किंवा प्राचार्यांना भेटून आपल्या पाल्याचा अभ्यास, त्याची प्रगती, दैनिक उपस्थिती व त्याचे आचरण इत्यादी बाबत चौकशी करावी.
२. आपण शक्यतोवर सत्राच्या प्रारंभीच आपल्या पाल्याची पाठयपुस्तके व सामुग्री याविषयी काळजी घ्यावी.
३. आपला पाल्य नियमितपणे शिक्षण करतो की नाही हया गोष्टीची शात्री त्याच्या ओळखपत्रावरून करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.
४. पालक— शिक्षक सभेला आपण उपस्थित राहावे.
५. आपल्या पाल्याच्या शिष्यवृत्ती किंवा शुल्क सवलती विषयीच्या अडचणी आमच्या निदर्शनास आणाव्यात. आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, विद्यार्थी निर्माण कार्यात अपेक्षित सहयोग देऊन आपण आमची गौरवशाली परंपरा अशीच पुढे चालू ठेवावी !

(संपूर्ण माहितीपत्रक महाविद्यालयाच्या **www.pwscollege.edu.in** या **website** वर उपलब्ध आहे)

# माहिती पत्रक (वरिष्ठ महाविद्यालय)

## महाविद्यालयाचा सत्रारंभ दि. ०५/०६/२०१६ ला होत आहे.

**अभ्यासक्रम :**

२०१६-२०१७ या अध्ययन सत्रात महाविद्यालयात (मराठी, हिन्दी व इंग्रजी) प्रथम, द्वितीय व अंत्य वर्ष (कला / वाणिज्य) हे वर्ग राहतील. विद्यार्थ्यांना मराठी, हिन्दी व इंग्रजी माध्यमातून कोणत्याही वर्गात आवश्यक पात्रतेनुसार प्रवेश प्राप्त करता येईल.

**१) कला शाखा (मराठी / हिन्दी / इंग्रजी) :-**

**प्रथम, द्वितीय व अंत्य वर्ष (कला)/B.A. Part-I, II, III (MAR./HIN./ENG.)**

Compulsory Subjects -

(1) Compulsory ENG. (2) Marathi / Hindi / Supp. English.

**Optional Subject** - (Choose any three subjects from following)

(1) Sociology, (2) Economics (3) Political Science.

(4) History, (5) Dr. Ambedkar Thoughts,

(6) English Literature (7) Marathi Literature

(8) Hindi Literature (9) Pali Literature.

**Note :-**

B.A. Part- I, II & III years students can choose Only One Literature out of four optional subjects.

B.A. Part-II Environmental Science (Compulsory)

**२) वाणिज्य शाखा (मराठी / हिन्दी / इंग्रजी) :-**

**प्रथम, द्वितीय व अंत्य वर्ष (वाणिज्य)/B.A. Part-I, II, III (MAR./HIN./ENG.)**

**B.Com.-I (Eng. / Mar. / Hin.)**

Compulsory Subjects -

(1) Compulsory English **(ENG)**, (2) Marathi / Hindi / Pali Prakrit **(Any One)**,

(3) Financial Accounts Paper-I **(F/A)**, (4)Fundamental of Statistics & Computer **(FSC)**,

(5) Principles of Business Management **(PBM)**, (6) Business Economics **(B/E)**,

(7) Company Law & Secretarial Practice **(CLSP)**

**B.Com.-II (Eng. / Mar. / Hin.)**

| Compulsory Subjects - | Theory | Internal Marks |
|---|---|---|
| (1) Compulsory English **(ENG)** | 100 | - |
| (2) Marathi / Hindi / Pali Prakrit **(Any One)** | 100 | - |
| (3) Environmental Science | - | - |
| (4) Financial Accounts Paper-II **(F/A)** | 100 | - |
| (5) Business and Industrial Law **(B/I Law)** | 100 | - |
| (6) Monetary Economics **(M/E)** | 100 | - |
| (7) Cost & Management Accounts **(CMA)** | 100 | - |
| (8) Business Communication **(BC)** | 80 | 20 |

**B.Com.-III (Eng. / Mar. / Hin.)**

| Compulsory Subjects - | Theory | Internal Marks |
|---|---|---|
| (1) Financial Accounts Paper-III **(F/A)** | 100 | - |
| (2) Income Tax & Auditing **(ITA)** | 100 | - |
| (3) Functional Management **(F/M)** | 100 | - |

| | | | |
|---|---|---|---|
| (4) | Indian Economics **(I/E)** | **100** | **-** |
| (5) | Business Finance **(B/F)** | **100** | **-** |
| (6) | Computerized Accounting **(COA)** | **80** | **20** |

**प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरिता विशेष सूचना व अटी :-**

१) महाविद्यालयात सत्र २०१६-१७ या सत्रात ड्रेस कोड लागू करण्यात आले आहे. ड्रेस कोड चे पालन करणे सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील. महाविद्यालयाने निर्धारीत केलेल्या ड्रेस मध्येच महाविद्यालय परिसरात प्रवेश मिळेल.

२) विद्यार्थ्यांनी १ ऑक्टोंबर २०१६ ते १५ ऑक्टोंबर २०१६ पर्यंत विद्यापीठ परीक्षा अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

३) शिष्यवृत्ती व फ्रिशिपधारक विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित झाल्यावर १५ दिवसाच्या आत शिष्यवृत्ती/फ्रिशिप अर्ज महाविद्यालयात सादर करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती व फ्रिशिप अर्ज महाविद्यालयात सादर न केल्यास विद्यार्थ्यांना पूर्ण फी भरावी लागेल.

४) प्रवेशाच्या वेळी घेतलेले विषय व माध्यम कोणत्याही परिस्थितीत बदलविता येणार नाही.

५) महाविद्यालय परिसरात बेशिस्त व बेजाबाबदार पणे वागल्यास नियमापमाणे विद्यार्थ्यांवर कठोर कार्यवाही केली जाईल.

६) महाविद्यालयाचे परिचय पत्र **(Identification Card)** महाविद्यालयाच्या परिसरात गळ्यात टाकून असल्यावरच महाविद्यालयाच्या परिसरात प्रवेश मिळेल.

उपरोक्त सर्व सूचनांचे व अटीचे पालन करणे सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे. पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करुन महाविद्यालयातून निलंबीत करण्यात येईल.

**विशेष टिप : ड्रेस कोड नुसार विद्यार्थ्यांचे ड्रेस लक्की फॅशन हॉऊस, बॅक कॉलोनी, नारी रोड नागपूर येथे रु. ७५०/- मध्ये उपलब्ध होतील. (मो. ९७६६९३९४९४)**

**आदेशानुसार**
**(प्राचार्य)**

## वर्गनिहाय प्रवेश फी

**Grant Courses B.A./B.Com.**
**The following fees are to be paid at the time of Admission**
**SESSION 2016-2017**

| | | B.A. / B.Com. | | |
|---|---|---|---|---|
| | | **Part - I** | **Part - II** | **Part - III** |
| **A)** | **Scholarship & Freeship Student** | **495/-** | **515/-** | **495/-** |
| **B)** | **Fullpayee & E.B.C. Student** | **2055/-** | **1965/-** | **2145/-** |
| **C)** | **Non-Grant (Eng. Medium)**<br>**Fullpayee & E.B.C. Student** | **4235/-** | **4145/-** | **4325/-** |

**Note :**

1) **Exam Fee Rs. 242/-**
2) **B.A./B.Com. Part-III Convocation Fee Rs. 200/-**

## SPECIAL COURSES

The following U.G.C. Sponsored Courses are available in the College.

**U. G. COURSES**:

1. Communicated English.
2. U.G.C. Net Work Resource Centre
3. Equal Opportunity Centre.

**P. G. COURSES:**

1. Remedial Caching for (S.C./S.T./O.B.C.) & Minorities (100 students excluding Creamy Layer).
2. Coaching for NET/ Set for (S.C./S.T./O.B.C.) & Minorities (excluding Creamy Layer)
3. Coaching Classes for entry in service for S.C./S.T./O.B.C.& Minorities (excluding Creamy Layer)
4. Career and Counseling Cell.

**Note : These courses are 'Free of charge for college students'** and nominal fees will be charged to the outside students.

## विशेष सूचना
## विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा सुविधा

संदर्भ : शासन निर्णय क्र. पी.आर.ई.—२०११ प्र.क्र.२४९/प्र.क्र.—१, दि. ११.७.२०११ विद्यार्थ्यांना महाविद्यालयात शिकत असतांना अपघातामुळे पोहचलेल्या क्षतीची काही प्रमाणात नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांना राजीव गांधी अपघात विमा योजना सुरू करण्यात आली आहे. सर्व विद्यार्थी या योजनेस पात्र राहतील.

१. आत्महत्येचा प्रयत्न करणे.
२. जाणीवपूर्वक स्वत:ला जखमी करून घेणे.
३. गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात.
४. नैसर्गिक मृत्यू.
५. मोटार शर्यतीत अपघात.

**GRANT COURSES B.A./B.Com.**
**The following fees are to be paid at the time of Admission**

**SCHOLARSHIP & FREESHIP STUDENTS**
**SESSION 2016-2017**

| Sr. No. | Particulars | B.A. / B.Com. Part - I | Part - II | Part - III |
|---|---|---|---|---|
| 1. | Tution Fees | - | - | - |
| 2. | College Fee | 25/- | 25/- | 25/- |
| 3. | Library Fee | - | - | - |
| 4. | Sports & Gymkhana Fee | - | - | - |
| 5. | Enrolment Form Fee | - | - | - |
| 6. | Enrolment Fee | - | - | - |
| 7. | Uni. Annual Fee | - | - | - |
| 8. | Uni. Medical Examination Form | - | - | - |
| 9. | Uni. Medical Exam Fee | - | - | - |
| 10. | Physical Efficency Test | - | - | - |
| 11. | Uni. Medical Aid Fee | - | - | - |
| 12. | Students Aid Fund | - | - | - |
| 13. | Students Welfare Fund | - | - | - |
| 14. | Students Union Fee | - | - | - |
| 15. | D.M.C. Fee | - | - | - |
| 16. | Uni. Games Fee | - | - | - |
| 17. | Ashwamegh Yogya | - | - | - |
| 18. | Environmental Studies | - | 20/- | - |
| 19. | E-Suvidha | - | - | - |
| 20. | Exam. Form Fee | 15/- | 15/- | 15/- |
| 21. | Identity Card | 25/- | 25/- | 25/- |
| 22. | College Annual Test Exam. | 150/- | 150/- | 150/- |
| 23. | Convocation Fee | - | - | - |
| 24. | Furniture & Elect. Equipment | 50/- | 50/- | 50/- |
| 25. | Identification Card | 30/- | 30/- | 30/- |
| 26. | Students Dev. Fund | 75/- | 75/- | 75/- |
| 27. | Extra Curricular activity | - | - | - |
| 28. | On-line Processing Fee | 50/- | 50/- | 50/- |
| 29. | College Magazine | 40/- | 40/- | 40/- |
| 30. | Flag Day Fee | 05/- | 05/- | 05/- |
| 31. | Computer Maintenance | - | - | - |
| 32. | Cycle Stand Fee | 20/- | 20/- | 20/- |
| 33. | Registration Fee | 10/- | 10/- | 10/- |
| | TOTAL | 495/- | 515/- | 495/- |

**Note :**

**1) Exam Fee Rs. 242/-**

**GRANT COURSES B.A./B.Com.**
**The following fees are to be paid at the time of Admission**

**FULL PAYEE AND E.B.C. STUDENTS**
**SESSION 2016-2017**

| Sr. No. | Particulars | B.A. / B.Com. Part - I | Part - II | Part - III |
|---|---|---|---|---|
| 1. | Tution Fees | 800/- | 800/- | 800/- |
| 2. | College Fee | 25/- | 25/- | 25/- |
| 3. | Library Fee | 100/- | 100/- | 100/- |
| 4. | Sports & Gymkhana Fee | 120/- | 120/- | 120/- |
| 5. | Enrolment Form Fee | 10/- | - | - |
| 6. | Enrolment Fee | 100/- | - | - |
| 7. | Uni. Annual Fee | 125/- | 125/- | 125/- |
| 8. | Uni. Medical Examination Form | 05/- | 05/- | 05/- |
| 9. | Uni. Medical Exam Fee | 20/- | 20/- | 20/- |
| 10. | Physical Efficency Test | 20/- | 20/- | 20/- |
| 11. | Uni. Medical Aid Fee | 05/- | 05/- | 05/- |
| 12. | Students Aid Fund | 30/- | 30/- | 30/- |
| 13. | Students Welfare Fund | 05/- | 05/- | 05/- |
| 14. | Students Union Fee | 05/- | 05/- | 05/- |
| 15. | D.M.C. Fee | 10/- | 10/- | 10/- |
| 16. | Uni. Games Fee | 25/- | 25/- | 25/- |
| 17. | Ashwamegh Yogya | 30/- | 30/- | 30/- |
| 18. | Environmental Studies | - | 20/- | - |
| 19. | E-Suvidha | 50/- | 50/- | 50/- |
| 20. | Exam. Form Fee | 15/- | 15/- | 15/- |
| 21. | Identity Card | 25/- | 25/- | 25/- |
| 22. | College Annual Test Exam. | 150/- | 150/- | 150/- |
| 23. | Convocation Fee | - | - | 200/- |
| 24. | Furniture & Elect. Equipment | 50/- | 50/- | 50/- |
| 25. | Identification Card | 30/- | 30/- | 30/- |
| 26. | Students Dev. Fund | 75/- | 75/- | 75/- |
| 27. | Extra Curricular activity | 40/- | 40/- | 40/- |
| 28. | On-line Processing Fee | 50/- | 50/- | 50/- |
| 29. | College Magazine | 100/- | 100/- | 100/- |
| 30. | Flag Day Fee | 05/- | 05/- | 05/- |
| 31. | Computer Maintenance | - | - | - |
| 32. | Cycle Stand Fee | 20/- | 20/- | 20/- |
| 33. | Registration Fee | 10/- | 10/- | 10/- |
| | TOTAL | 2055/- | 1965/- | 2145/- |

**Note :**

1) Exam Fee Rs. 242/-

**NON-GRANT COURSES B.A./B.Com.**
**The following fees are to be paid at the time of Admission**

**FULL PAYEE AND E.B.C. STUDENTS**
**SESSION 2016-2017**

| Sr. No. | Particulars | B.A. / B.Com. Part - I | Part - II | Part - III |
|---|---|---|---|---|
| 1. | Tution Fees | 2400/- | 2400/- | 2400/- |
| 2. | College Fee | 25/- | 25/- | 25/- |
| 3. | Library Fee | 300/- | 300/- | 300/- |
| 4. | Sports & Gymkhana Fee | 300/- | 300/- | 300/- |
| 5. | Enrolment Form Fee | 10/- | - | - |
| 6. | Enrolment Fee | 100/- | - | - |
| 7. | Uni. Annual Fee | 125/- | 125/- | 125/- |
| 8. | Uni. Medical Examination Form | 05/- | 05/- | 05/- |
| 9. | Uni. Medical Exam Fee | 30/- | 30/- | 30/- |
| 10. | Physical Efficency Test | 30/- | 30/- | 30/- |
| 11. | Uni. Medical Aid Fee | 05/- | 05/- | 05/- |
| 12. | Students Aid Fund | 100/- | 100/- | 100/- |
| 13. | Students Welfare Fund | 05/- | 05/- | 05/- |
| 14. | Students Union Fee | 05/- | 05/- | 05/- |
| 15. | D.M.C. Fee | 10/- | 10/- | 10/- |
| 16. | Uni. Games Fee | 25/- | 25/- | 25/- |
| 17. | Ashwamegh Yogya | 30/- | 30/- | 30/- |
| 18. | Environmental Studies | - | 20/- | - |
| 19. | E-Suvidha | 50/- | 50/- | 50/- |
| 20. | Exam. Form Fee | 15/- | 15/- | 15/- |
| 21. | Identity Card | 25/- | 25/- | 25/- |
| 22. | College Annual Test Exam. | 150/- | 150/- | 150/- |
| 23. | Convocation Fee | - | - | 200/- |
| 24. | Furniture & Elect. Equipment | 50/- | 50/- | 50/- |
| 25. | Identification Card | 30/- | 30/- | 30/- |
| 26. | Students Dev. Fund | 75/- | 75/- | 75/- |
| 27. | Extra Curricular activity | 150/- | 150/- | 150/- |
| 28. | On-line Processing Fee | 50/- | 50/- | 50/- |
| 29. | College Magazine | 100/- | 100/- | 100/- |
| 30. | Flag Day Fee | 05/- | 05/- | 05/- |
| 31. | Computer Maintenance | - | - | - |
| 32. | Cycle Stand Fee | 20/- | 20/- | 20/- |
| 33. | Registration Fee | 10/- | 10/- | 10/- |
| | TOTAL | 4235/- | 4145/- | 4325/- |

**Note :**

1) Exam Fee Rs. 242/-

## इतर महत्वाच्या सुचना

**१. शुल्क संबंधी सूचनाः**

अ. प्रवेश प्राप्त झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला महाविद्यालयाचे सर्व शुल्क देणे आवश्यक ओह. शुल्काची संपूर्ण रक्कम प्राप्त झाल्याशिवाय महाविद्यालयाकडून विद्यार्थ्याला कोणतेही प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

ब. मागासवलेल्या जाती जमातीली, आर्थिक दृष्टया मागासलेल्या व इतर संबंधीत विद्यार्थ्याची शासकीय शिष्यवृत्ती अथवा शुल्क सवलीचा अर्ज नामंजूर झाल्यास महाविद्यालयाचे पूर्ण शुल्क भरावे लागेल.

क. बी.ए. व बी.कॉम. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळीच विद्यापीठ नामांकन अर्ज भरणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवेश देण्यात येणार नाही.

ड. विद्यापीठाने शुल्कसंबंधी बदल केल्यास त्यानुसार ते बदल लागू होतील.

**२. शिष्यवृत्ती संबंधी सूचनाः**

अ. भारत सरकारद्वारे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती व सवलती

१. अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्याकरीता (Schedule Caste and Tribe Student)

विद्यार्थ्यांना भारत सरकारद्वारे महाविद्यालयाच्या शुल्का सोबत मालिक शिष्यवृत्ती दिली जाते. महाविद्यालयाच्या शुल्काचा जो भाग शासनाने दिलेला नसतो तो विद्यार्थ्यांना द्यावा लागतो. ही शिष्यवृत्ती महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत दिली जाते. हया शिष्यवृत्ती करिता आवश्यक असलेले आवेदन पत्र प्रवेश प्राप्तीनंतर विद्यार्थ्याने ताबडतोब भरून द्यावे. हया आवेदन पत्रसोबत. १) पूर्वी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेत्री गुणपत्रीका २) स्वतःच्या पालकाचा उत्पन्नाचा दाखला ३) जातीचे प्रमाणपत्र आणि ४) अध्ययन काळात खंड पडला असल्यास त्याच खंड काळ संबंधीचे न्यायालयातून देण्यात येणारे प्रमाणपत्र (Court Affidavit for Gap) जोडणे आवश्यक आहे. अपुर्ण माहिती मुळे शिष्यवृत्तीचा अर्ज नामंजूर झाल्यास, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे पूर्ण शुल्क भरावे लागेल.

२. कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्याककरिता (Lower Income Group)

वरील श्रेणीत व येणाऱ्या परंतु घरचे वार्षिक उत्पन्न कमी असल्यास विद्यार्थ्यांनी पहिल्या श्रेणीत शिष्यवृत्ती करीता नमुद केलेल प्रमाणपत्रासहित भारत सरकार शिष्यवृत्ती आवेदनपत्र सादर करावेत. अर्जासोबत E.B.C. च्या आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या शुल्क सवलतीचा अर्ज सादर करावा. वरील सवलती करीता अर्ज ३१.८.२०१५ पर्यंत करावेत.

३. शुल्क सवलत एकाच वर्गात फक्त एकदाच अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याकरिता.

अनुसूचित जाती— जमातीतील विद्यार्थ्यांनी एकाच वर्गात फक्त एकदाच अनुत्तीर्ण झाले असल्यास त्याचवर्गात अध्ययन चालू ठेवण्याकरिता शुल्क सवलती दिल्या जाते हया सवलतीच्या बाबतीत शिक्षण काळात जर खंड पडला असेल तर खंडित काळाचे न्यायालयाचे प्रमाणपत्र (Court Affidavit for gap) सादर करणे आवश्यक आहे. हया सवलतीत शिक्षण शुल्काव्यतिरिक्त प्रवेश शुल्क, ग्रंथालय

शुल्क, जिमखाना शुल्क आणि परिक्षा शुल्क, शासनाद्वारे दिली जाते. महाविद्यालयाचे उरलेले शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागेल. वरील सवलती करिता अर्ज ३१.८.२०१५ पर्यंत करावेत.

४. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती:

सत्तर टक्यपेक्षा अधिक गुण प्राप्त अशा उच्च श्रेणीच्या विद्यार्थ्याना ही शिष्यवृत्ती मिळू शकते. हया शिष्यवृत्ती करिता आवश्यक आवेदन पत्र कार्यालयात ३१.८.२०१५ पर्यंत करावेत.

ब. राज्य शासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती व सवलती

१. राज्य गुणवत्ता शिष्यवृत्ती

ज्या विद्यार्थ्यांना माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक परीक्षेत सत्तर टक्याहून अधिक गुण प्राप्त झाले असतील त्यांना राज्य शासनाद्वारे गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळू शकते.

२. स्वातंत्र्य संग्राम सैनिक शिष्यवृत्ती

स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या मुला/ मुलींना राज्य शासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती करिता आवेदन अर्जासोबत गुणपत्रीकेची सत्य प्रतिलिपी, उत्पन्नाचे प्रमाणपत्र व कारागृह अधिक्षकांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. हया सबंधीत अर्ज दिनांक ३१.८.२०१५ पर्यंत कार्यालयात सादर करावा.

३. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती

प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात कार्य करणाऱ्या मुलांना/ मुलींना राज्य शासनाद्वारे ही शिष्यवृत्ती दिली जाते या करिता लागणाऱ्या आवेदन पत्रासोबत विद्यार्थ्याना गुणपत्रिकेची सत्य प्रतिलिपी व वडील ज्या शिक्षण संस्थेत कार्य करीत आहेत त्या संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. वरील सवलती करिता ३१.८.२०१५ पर्यंत अर्ज करावेत.

४. शैक्षणिक सत्र २००७—०८ पासून शासनाद्वारे सुरू करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती योजना:

अ. अहिंदी भाषिक राज्यातील अहिंदी भाषिक विद्यार्थ्याना परिक्षेत्तर अभ्यासक्रमासाठी देण्यात येणारी केंद्र शासनाची हिंदी शिष्यवृत्ती योजना

ब. अल्पसंख्यक— मुस्लीम, पारशी, शिख, ख्रिश्चन, व बौद्ध या सामाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्याना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ति योजना.

**टिप—अधिक माहितीकरिता महाविद्यातयातील शिष्यवृत्ती विभागाशी संपर्क साधावा.**

५. आर्थीक दृष्टया मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्याकरिता शुल्क सवलती (Economically Backward Class Students)

ज्या विद्यार्थ्याच्या कुटुंबियाने एकूण वार्षिक उत्पन्न रू. ५०००० च्या आत असेल अशा विद्यार्थ्याना राज्य शासनातर्फे शुल्क सवलत दिली जाते. महाविद्यालयाचे उरलेले शुल्क व परिक्षा शुल्क विद्यार्थ्याा भरावे लागेल. महाविद्यालयात प्रवेश प्राप्त केल्यानंतर पंधरा दिवसाचे आतच हा अर्ज कार्यालयात सादर करावा. ज्या विद्यार्थ्याचे पालक सरकारी नोकरीत असतील त्यांना सवलत मिळणार नाही.

**शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना सूचना—**

अ. कोणत्याही विद्यार्थ्यास एकाहून अधिक शिष्यवृत्ती शुल्क सवलत प्राप्त करता येणार नाही. वरील सवलती करीता ३१.८.२०१५ पर्यंत अर्ज करावेत.

ब. प्रत्येक शिष्यवृत्ती किंवा शुल्क सवलत धारक विद्यार्थ्याला वर्गात ७५ प्रतिशत उपस्थिती आवश्यक असते.

क. प्रत्येक शिष्यवृत्ती किंवा शुल्क सवलत धारक विद्यार्थ्याला महाविद्यालयातील व विद्यापिठाच्या सर्व परिक्षाकांना बसणे आवश्यक आहे.

ड. प्रत्येक शिष्यवृत्ती अथवा शुल्क सवलत प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याने जर अपूर्ण अथवा असत्य माहिती दिली असेल तर शासनाचे कायदेशीर कारवाईची संपूर्ण जबाबदारी त्या विद्यार्थ्यावर व पालकावर राहील.

इ. ज्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती किंवा शुल्क सवलतीचा अर्ज रद्द करण्यात आला असेल त्याला महाविद्यालयाचे व विद्यापिठाचे पूर्ण शुल्क भराव लागेल.

**३. पुरस्कार ( विद्यार्थ्यासाठी रोख पारितोषिक)**

**१. वाणिज्य विभाग:**

अ. बी. कॉम. १— मध्ये वित्तीय लेखाकर्म १ या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास स्व. दत्तोपंत मिसाळा यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा. मोहन मिसाळ यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

ब. बी.कॉम. १— मध्ये व्यवसाय व्यवस्थानाचे, मुलतत्वे या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. सुरेश भागवत यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

क. बी.कॉम.१—मध्ये व्यावसायीक अर्थशास्त्र याविषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रा.विवेक चव्हाण यांचेकडून रू ५०१ चे रोख बक्षिस

**२. अर्थशास्त्र विभाग:**

अ. बी.ए.१— मध्ये अर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. प्रज्ञा बागडे यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

ब. बी.ए.२— मध्ये अर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. प्रज्ञा बागडे यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

क. बी.ए.३— मध्ये अर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. प्रज्ञा बागडे यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**३. समाजशास्त्र विषय:**

अ. बी.ए.१—मध्ये समाजशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. कमलाकर तागडे यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**४. राज्यशास्त्र विभाग:**

अ. बी.ए.१—मध्ये राज्यशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रा. डॉ. विमल राठोड यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**५. इतिहास विभाग:**

अ. बी.ए.२—मध्ये इतिहास याविषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. महेन्द्र गायकवाड यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

ब. बी.ए.१—मध्ये इतहास याविषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रा. चंद्रशेखर यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**६. डॉ. आंबेडकर विचारधारा:**

अ. बी.ए.१—मध्ये डॉ.आंबेडकर विचारधारा या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. महेन्द्र गायकवाड यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**७. इंग्रजी विभाग—**

अ. बी.ए.१— मध्ये आवश्यक इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. शुभा मिश्रा यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

ब. बी.कॉम.१— मध्ये आवश्यक इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. मेघा रामटेके यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

क. बी.ए.३ — मध्ये आवश्यक इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रा.सुदेश ब. भोवते यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**८. हिंदी विभाग:**

अ. बी.ए.१— मध्ये हिन्दी साहित्य या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. जे. अवस्थी यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

ब. बी.ए.१— मध्ये हिन्दी आवश्यकया विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. जे. अवस्थी यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

क. बी.कॉम १— मध्ये आवश्यक हिन्दी याविषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. जे. अवस्थी यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**९. मराठी विभाग:**

अ. बी.ए.१— मध्ये मराठी साहित्य या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. इंद्रजित ओरके यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

ब. बी.ए.२— मध्ये मराठी साहित्य या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. मनीषा नागपूरे यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

क. बी.काम १— मध्ये मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रा. अमृता डोर्लीकर यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**१०. पाली विभाग:**

अ. बी.ए.१— मध्ये पाली विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रा. प्रणोती सहारे यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

ब. बी.काम.१— मध्ये पाली विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. प्रतिभा पाखिड्डे यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षिस.

**११. क्रीडा विभाग:**

5-A side Football tournament ला आंतर महाविद्यालयीन फुटबाल स्पेर्धत उत्कृष्ट खेळाडु म्हणून गौरवांवित होणाऱ्या विद्यार्थ्या विभागप्रमुख डॉ. आत्माराम पांडे यांचे कडून रू. ५०१ चे रोख बक्षीस.

**४. प्रवास सवलत** (Students Railway Concession)

नागपूरला शिक्षण घेण्यास बाहेरगांवावरून आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वडिलांच्या स्थाई पत्यावर (Permanent Home Address) कन्सेशन वर्षातून फक्त २ वेळाच दिले जाईल. त्याकरिता त्यांना त्यांच्या गांव/ शहर प्रमुखाकडून प्रमाणित केलेले राहण्याचे प्रमाणपत्र (Residing Certificate to be Certified by the responsible person of the town/ village) प्रवेश पत्रासोबत सादर करावे लागेल.

**५. सहल सवलत :**

ज्या विद्यार्थ्यांना सहल सवलत हवी असेल त्यांनी कमीतकमी १० विद्यार्थ्यांचा गट करून अर्ज केल्यास सवलत देण्यात येईल.

**टिप—रेल्वे सवलतीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वत:चे संबंधीत कारकुनाच्या कार्यलयात दाखवावे लागेल.**

**६. महाविद्यालयीन परीक्षा:**

वार्षिक, चाचणी परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा प्रत्येक विद्यार्थ्याला देणे अनिवार्य अहो. कोणतेही अर्ज न देता किंवा प्राचार्याची लेखी अनुमती न घेता परीक्षेला गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति पेपर रू २० प्रमाणे दंड आकारला जाईल.

**७. विश्वविद्यालयीन परीक्षा:**

विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षा सामान्यत: मार्च/ एप्रिल महिन्यामध्ये आयोजित केल्या जातात. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक विषयात ७५ प्रतिशत उपस्थिती अनिवार्य असते. अपुर्ण असल्यास विद्यापीठाच्या परीक्षेला बसण्याची परवानगी नाकारली गेल्यास त्यासंबंधीची संपुर्ण जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यावर राहील. विद्यापीठ परिक्षा अर्ज दि. १ ऑक्टो. २०१५ ते १५ ऑक्टो. २०१५ पर्यंत महाविद्यालयात सादर करावे.

**८. उपस्थिती:**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विद्यार्थ्याचे त्यांच्या वर्गाच्या प्रत्येक तासाला नियमित उपस्थित राहणे आवश्यक आहे. वर्गातील अनुपस्थिती करीता दर तासाला रू ५ दंड आकारला जाईल.

सुटीच्या अर्जावर वडीलांची/ पालकांची प्रति स्वाक्षरी आवश्यक आहे. वैद्यकीय कारणाकरिता सुटी हवी असल्या अर्जासोबत योग्य प्रमाणपत्र जोडावे.

**९. ग्रंथालय / वाचनालय :**

महाविद्याविद्यालयीन उच्च शिक्षणाला आवश्यक असा पाठयपुस्तकांच्या संदर्भ ग्रंथाचा तसेच सामान्य ज्ञानार्जनाला आवश्यक अशा पाच लक्षाहुन अधिक रूपये किमतीच्या ग्रंथाचा संग्रह केलेला आहे.

हयाखेरीज महाविद्यालयात पुस्तक पेढीची (Book bank) व्यवस्था विद्यापीठ अनुदान मंडळाच्या मदतीने सुरू करण्यात आली. पेढीचा उपयोग समतीने निश्चित केलेल्या नियमाप्रमाणे गरजू विद्यार्थ्यांना घेत येईल.

परीक्षा काळात फेब्रुवारी/मार्च महिन्यामध्ये रात्रीची लायब्ररीमध्ये अभ्यासासाठी बसण्याची व्यवस्था केली आहे. सायंकाळी ४ ते ६ वाजे पर्यंत गरजू विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. ग्रंथालयासंबंधीचे नियम विद्यार्थ्यांनी पाळणे अनिवार्य राहील.

**ग्रंथालयासंबंधी नियम:**

१. ग्रंथालय कार्डावर प्रत्येक विद्यार्थ्यांने आपला पासपोर्ट आकारचा फोटो लावणे आवश्यक आहे.
२. ग्रंथालय कार्ड हरविल्या १० रू भरल्यावर त्याचे डुप्लीकेट कार्ड ग्रंथालयतून मिळेल.
३. पुस्तक फाटले किंवा हरविल्यास दीडपट किंमत भरून द्यावी लागेल.
४. दिलेल्या कालावधीत पुस्तक परत न केल्यास प्रत्येक दिवसाला १ रू दंड द्यावा लागेल

**१०. वैद्यकीय परीक्षा:**

विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याची स्वास्थ परिक्षा होणे आवश्यक आहे. ही परीक्षा सामान्यत: नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात होत असते. जो विद्यार्थी या परीक्षेला हजर राहणार नाही त्याला विद्यापीठाद्वारे रू २० दंड होईल व विद्यापीठ परीक्षेला बसण्याची मनाई करण्यात येईल.

**११. खेल क्रीडा :**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शारीरिक शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित खेळामध्ये भाग घेणे त्यांच्याच हिताचे असते. आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत भाग

घेण्याकरिता महाविद्यालयातून खेळात सातत्याने भाग घेणाऱ्या विद्यार्थ्याची निवड होत असते. खेळ क्रिडासंबंधी सोयी सवलतीचा विद्यार्थ्यानी उपयोग घ्यावा.

१२. **शारीरिक क्षमता परीक्षा :**

विद्यापीठाच्या नियमानुसार सर्व विद्यार्थ्याच्या शारीरिक क्षमतेच्या कार्यक्रम सामान्यत: जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात आयोजीत केला जातो. या परीक्षेला बसणे आवश्यक आहे. खेळ क्रीडा व शारीरिक क्षमता परीक्षेसंबधी विद्यार्थ्यानी शारीरिक शिक्षक (PET) यांच्याशी संपर्क साधावा.

१३. **राष्ट्रीय सेवा योजना** (N.S.S.)

भारत सरकारने आखलेल्या राष्ट्रीय सामाजिक सेवा योजनते आपले महाविद्यालय अंतर्भूत करण्यात आले आहे. पदवीपूर्व सर्व विद्यार्थ्यांना सेवायोजनेत भाग घेता या योजनेत १) प्रौढशिक्षण २) क्रीडा कार्यक्रम ३) गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम ४) खेडे विभगातील रस्ते दुरूस्ती ५) खेडे सुधार कार्यक्रम ६) वृक्षारोपण ७) श्रमदान आयोजित विशेष शिबीराला भाग घेणे विद्यार्थ्याया हितावह आहे, यासंबंधी विद्यार्थ्यांनी कार्यक्रम अधिकाऱ्यांशी संपर्क साधवा.

१४. **राष्ट्रीय छात्र सैनिक** (N.C.C.)

विद्यार्थ्याकरिता राष्ट्रीय छात्र सेनेत नामांकनाची सवलत उपलब्ध आहे.

मुलाला एयरविंग, नेव्हल व अर्टिलरी एन.सी.सी. मध्ये भाग घेता येतो तसेच मुलींनाही एन.सी.सी. मध्ये भाग घेता येतो.

सुचना: एन.सी.सी. (आर्मीविंग, नेवलविंग, एअरविंग) मध्ये प्रवेश घेऊ ईच्छिणाऱ्या महाविद्यालयीन सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींना महाविद्यालयात नाव नोंदविण्याकरिता डॉ. यशवंत पाटील यांचेशी संपर्क साधावा.

१५. **शारिरीक शिक्षण:**

शारिरीक शिक्षण हे महाविद्यालयीन शिक्षणाचे एक महत्वाचे अंग आहे. शारिरीक शिक्षणाच्या वर्गाचा उपस्थित राहणे आवश्यक आहे. हयाकरीता ८० प्रतिशत उपस्थिती अट लागू होईल.

१६. **विद्यार्थी सहायता निधी:**

हया निधीतून गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके खरेदी करण्याकरिता किंवा विद्यापीठ परिक्षेचे शुल्क भरण्याकरिता आर्थिक मदत दिली जाते ही मदत ज्यांना कोणतेही शिष्यवृत्ती किंवा सवलत मिळत नाही. अशा विद्यार्थ्याना मिळेल. गरजू विद्यार्थ्यांना अभ्यास विषयक प्रगतीवर, उपस्थितीवर आणि सौजयपूर्ण व्यवहारावर ही मदत अवलंबून असते, यासंबंधी विद्यार्थ्यानी जानेवारी महिन्यात प्राचार्याशी संपर्क प्रस्थापित करावा.

१७. **अध्ययन विहार** (Study circle)

विद्यार्थ्याच्या बौद्धिक व कलागुणांच्या विकासासाठी अध्ययन विहार वैशिष्टपूर्ण ठरावे. महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला या मंडळाचा सदस्य होणे अनिवार्य आहे. या मंडळाद्वारे महत्वाचे जयंती व पुण्यतिथी समारंभ चर्चा सत्र डॉ. आंबेडकर व्याख्यानमाला, आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा इ. विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.

१८. **सायकल स्टॅंड :**

संपूर्ण सत्रासाठी एकूण शुल्क रू २० राहील हे शुल्क फक्त सायकल स्टॅंडचे भाडे आहे. सायकल स्टॅंडचा बिल्ला हरविल्यास रू २५ दंड आकारण्यात येईल.

**कार्यकारी प्राचार्य**